IMAGINATIVE INK PUBLICATIONS

Estd Year: 2024

ISSN : 3107-6661

Impact Factor : 5.75

# IIP: WORLD JOURNAL OF HUMANITIES AND SOCIAL SCIENCES

VOLUME -1 , ISSUE - IV

October - December 2025



Editor-in- Chief

DR. S. S. MASKE

WWW.IIPUBLICATIONS.COM

IIP: World Journal of Humanities and Social Sciences (IIP: WJHSS)
Volume 1, Issue IV | October–December 2025 | ISSN: 3107-6661 (Online)

# Department of Political Science — Index of Papers


| Sr. No. | Title of Paper | Author(s) | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | लोकशाहीची संकल्पना व अकोले तालुक्यातील आदिवासी राजकीय नेतृत्व | Dagale, A. N. & Sheikh, W. A. R. | 189–196 |
| 2 | भारताची वाढती भू-राजकीय महत्त्वाकांक्षा आणि चीन-अमेरिका स्पर्धा: धोरणात्मक संधी आणि आव्हाने | Atar, A. S. | 197–200 |
| 3 | भारतीय राजकीय विचारवंत आणि सामाजिक परिवर्तन: एक विश्लेषणात्मक अभ्यास | Giri, B. K. & Nandeshwar, P. K. | 201–207 |
| 4 | भारतीय राजकीय विचारवंत आणि सामाजिक परिवर्तन (राजा राममोहन रॉय, महात्मा फुले आणि स्वामी विवेकानंद) | Deshmukh, J. | 208–211 |
| 5 | भारतीय राजकीय विचारधारेतील सामाजिक परिवर्तन: गांधी, आंबेडकर, नेहरू आणि जयप्रकाश नारायण यांच्या योगदानाचा चिकित्सक अभ्यास | Auti, M. E. | 212–220 |
| 6 | 75th Years of Indian Constitution | Jawale, R. J. | 221–224 |
| 7 | Gender Justice Under the Indian Constitution | Suryawanshi, M. N. | 225–233 |
| 8 | 75 Years of the Indian Constitution: Evolution, Achievements and Challenges | Hajare, M. G. | 234–239 |
| 9 | भारत आणि जागतिक राजकारण (India and Global Politics) | Kshirsagar, P. | 240–244 |
| 10 | भारतीय लोकशाहीतील डिजिटल परिवर्तन: ई-गव्हर्नन्स आणि डिजिटल इंडिया | Patil, P. P. | 245–251 |
| 11 | Dr. B. R. Ambedkar and Social Transformation | Charankar, P. A. | 252–257 |
| 12 | जागतिक राजकारणातील भारत: धोरण, प्रभाव आणि भविष्यातील दिशा | Patil, P. V. Z. | 258–265 |
| 13 | इंडो-पॅसिफिक भू-राजकारण: भारताची भूमिका | Jadhav, B. K. | 266–271 |
| 14 | 75 Years of Indian Constitution and Indian Republic | Ghorpade, S. S. | 272–276 |
| 15 | भारतीय संविधानाची अमृत वर्षे आणि लोकशाही भारत | Kasbe, P. D. | 277–284 |
| 16 | महाराष्ट्र विधानसभा राखीव मतदार संघातील राजकीय नेतृत्वाचा अभ्यास | Nadekar, R. S. & Shinde, B. A. | 285–289 |
| 17 | भारतीय निवडणुकांवरील सामाजिक माध्यमांचा प्रभाव: निवडणुकांचे बदलते आयाम | Jaykar, R. S. & Patil, T. M. | 290–295 |
| 18 | नारीवाद आणि लैंगिक न्याय | Patil, S. M. | 296–299 |
| 19 | Recent Trends in Political Theory | Padghan, A. R. | 300–307 |
| 20 | Indian Political Thinkers and Social Transformation: Buddha, Basavanna, Phule, Ambedkar and Periyar | Kamble, K. S. & Kore, V. G. | 308–314 |
| 21 | दक्षिण आशियातील भारताचे नेतृत्व आणि जागतिक परिणाम | Phunne, N. S. | 315–319 |
| 22 | सांप्रदायिकतेचे राजकारण व महात्मा गांधीचे राजकीय विचार | Lokhande, B. B. | 320–324 |
| 23 | जागतिक राजकारणातील भारताचे स्थान | Patil-Shetke, D. S. | 325–329 |
| 24 | राजकीय संवाद आणि लोकशाही | Kore, V. G. & Rathod, S. K. | 330–335 |

| Sr. No. | Title of Paper | Author(s) | Page No. |
|---|---|---|---|
| 25 | Global Conflict and the Indian Context: Dr. B. R. Ambedkar's Reflections on the Second World War | Kadu, A. A. | 336–343 |
| 26 | Euthanasia: Indian and International Legal Perspective | Mahapure, P. S. | 1465–1468 |
| 27 | महिलांचे अधिकार जाणीव-जागृतीत भारतीय संविधानाचे योगदान | Muluk, S. R. | 1469–1474 |
| 28 | लोकशाही संवर्धनासाठी राजकीय सुसंवादाची गरज व महत्त्व | Hake, D. D. | 1475–1480 |
| 29 | न्या. महादेव गोविंद रानडे यांचा उदारमतवाद आणि सामाजिक परिवर्तन | Chavan, S. & Patil, S. C. | 1481–1486 |
| 30 | भारतीय संसद आणि महिलांचे प्रतिनिधित्व: एक चिकित्सक अभ्यास | Mulla, S. M. | 1487–1490 |
| 31 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक परिवर्तनातील भूमिका | Bansode, J. P. | 1491–1495 |
| 32 | स्त्री सबलीकरण: आव्हाने आणि उपाययोजना | Koli, L. D. | 1496–1499 |
| 33 | स्त्रीवाद आणि लिंगन्याय : एक संशोधनात्मक अभ्यास | Chavan, M. S. | 1500–1504 |
| 34 | महात्मा फुले यांचे समाज परिवर्तन कार्य | Kambire, R. B. | 1505–1509 |
| 35 | बहुध्रुवीय जग आणि भारत | Chavan, R. S. | 1510–1515 |
| 36 | भारतातील आरक्षण धोरण आणि समान संधी | Kadam, R. S. | 1516–1521 |
| 37 | लोकशाहीतील राजकीय संवादाची भूमिका : एक विश्लेषण | Bagal, S. N. | 1522–1526 |
| 38 | संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषद सुधारणा – भारताच्या स्थायी सदस्यत्वाच्या दाव्याचे मूलभूत आधार | Kudale, T. D. & Dahalke, B. M. | 1527–1531 |
| 39 | बहुसंस्कृतीवाद आणि राष्ट्रवाद | Patil, A. N. | 1532–1536 |
| 40 | Nuclear Weapons Changed World Politics | Inamdar, R. K. | 1537–1541 |
| 41 | A View on India's Foreign Policy from Pre-Independence to Post-Independence Era | Potdar, V. M. | 1542–1548 |
| 42 | महाराष्ट्र विधानसभा सदस्यांनी वापरलेली संसदीय आयुधांचा अभ्यास : लक्षवेधी सूचना आणि स्थगन प्रस्ताव | Biradar, D. D. & Pagar, A. R. | 1549–1551 |
| 43 | Political Communication and Democracy | Dahalake, B. M. | 1552–1556 |
| 44 | सर सय्यद अहमद खान यांचे सामाजिक आणि राजकीय विचार : एक अभ्यास | Pathan, A. I. | 1557–1561 |
| 45 | कायद्यांबाबत पं. जवाहरलाल नेहरू यांचे विचार | Patil, P. V. | 1562–1567 |
| 46 | भारतीय राज्यघटनेची ७५ वर्षांतील वाटचाल | Jadhav, M. S. | 1568–1572 |
| 47 | महिला सबलीकरणात बिगर शासकीय संस्थांची भूमिका | Shinde, P. A. | 1573–1577 |
| 48 | Dr. B. R. Ambedkar's Political Thoughts and Social Transformation | Kamble, S. B. | 1578–1582 |
| 49 | Socio-Political Thought of Mahatma Jyotirao Phule | Patil, S. S. | 2379–2384 |
| 50 | Raja Ram Mohan Roy: Father of Modern India | Kothavale, S. V. | 2385–2387 |


*Total Papers: 50*

IIP: WJHSS
IIP
World Journal of Humanities and Social Sciences

**An Online Peer-Reviewed / Refereed Journal**
Vol: 01 No. Issue IV, (October-December) (2025)
Impact Factor: IIFS: 5.75
ISSN: 3107-6661 (Online)

# न्या. महादेव गोविंद रानडे यांचा उदारमतवाद आणि सामाजिक परिवर्तन

**[1]प्रा. डॉ. सचिन चव्हाण, [2]डॉ. शितल चंद्रकांत पाटील**
राज्यशास्त्र विभाग, नाईट कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स, इचलकरंजी
डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर, (बुर्ली)

**Article Info**

***Article History:***
Received: 15th Dec 2025
Accepted: 18th Dec 2025
Published: 20th Dec 2025

***Keywords:***

*सामाजिक परिवर्तन*

**ABSTRACT**

एकोणिसाव्या शतक हे महाराष्ट्राच्या इतिहासात फार महत्त्वाचे शतक ठरले. प्रबोधनाचा कालखंड किंवा सामाजिक परिवर्तनाचा कालखंड म्हणूनही या शतकाकडे पाहिले जाते. सामाजिक संस्था, चळवळीच्या माध्यमातून प्रबोधनपर्वाला सुरुवात झाली होती. या सर्व परिस्थितीचा प्रभाव भारतावर परिणामतः महाराष्ट्रावर होत होता. ज्या पाश्चात्य उदारमतवादी तत्त्वज्ञानाने संपूर्ण युरोप भारावलेला होता त्या उदारमतवादी तत्त्वज्ञानाने तेथील बुद्धिजीवी वर्ग देखील प्रभावित झाला होता. प्रस्थापित समाजाला उदारमतवादाची असणारी उपयुक्तता ओळखूनच त्याच्या स्वीकारास येथील बुद्धीजीवी वर्ग सज्ज होता. ज्या ज्या व्यक्तींनी उदारमतवादी तत्त्वाचा स्वीकार करून कार्यास सुरू केली होती त्यामध्ये न्या. महादेव गोविंद रानडे यांचे नाव अग्रस्थानी घ्यावे लागेल.

***Plagiarism Check Report:***
Date of Report: Dec 17, 2025
Similarity Index: 6%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2025 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite:** Chavan, S., & Patil, S. C. (2025). न्या. महादेव गोविंद रानडे यांचा उदारमतवाद आणि सामाजिक परिवर्तन. *IIP: World Journal of Humanities and Social Sciences (IIPWJHSS)*, 1(VI), 1481–1486.

प्रस्तावना –

एकोणिसाव्या शतक हे महाराष्ट्राच्या इतिहासात फार महत्त्वाचे शतक ठरले. प्रबोधनाचा कालखंड किंवा सामाजिक परिवर्तनाचा कालखंड म्हणूनही या शतकाकडे पाहिले जाते. सामाजिक संस्था, चळवळीच्या माध्यमातून प्रबोधनपर्वाला सुरुवात झाली होती. या सर्व परिस्थितीचा प्रभाव भारतावर परिणामतः महाराष्ट्रावर होत होता. ज्या पाश्चात्य उदारमतवादी तत्त्वज्ञानाने संपूर्ण युरोप भारावलेला होता त्या उदारमतवादी तत्त्वज्ञानाने तेथील बुद्धिजीवी वर्ग देखील प्रभावित झाला होता. प्रस्थापित समाजाला उदारमतवादाची असणारी उपयुक्तता ओळखूनच त्याच्या स्वीकारास येथील बुद्धीजीवी वर्ग सज्ज होता. ज्या ज्या व्यक्तींनी उदारमतवादी तत्त्वाचा स्वीकार करून कार्यास सुरू केली होती त्यामध्ये न्या. महादेव गोविंद रानडे यांचे नाव अग्रस्थानी घ्यावे लागेल.

न्या. महादेव गोविंद रानडे हे १९ व्या शतकामध्ये कार्य करणारे व्यासंगी व्यक्तिमत्व होते. ज्ञानी समाजसुधारक, विविध संस्थांचा संस्थापक, तत्वचिंतक, अर्थशास्त्रज्ञ, प्रतिष्ठित न्यायमूर्ती असे व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू असणारे असे हे बहुआयामी व्यक्तिमत्व होते. त्यांनी देशाच्या प्रत्येक गोष्टीचा सखोल चिंतन केले. देशाची आर्थिक, राजकीय, सामाजिक स्थिती समोरील आव्हाने आणि समस्या यावर विपुल लेखन केले. याकरता त्यांनी समाजात विविध उपक्रम सुरू केले. संस्था स्थापन केल्या. अनेक चळवळींना प्रोत्साहन दिले. कार्यांना प्रेरणा दिली, सहाय्य केले, मार्गदर्शन केले. मुलींची शाळा, ग्रंथालय, संग्रहालय, व्याख्यानमाला, बँक साहित्य परिषद अशा विविध गोष्टींचा त्यात समावेश होतो. सनदशीर मार्गाचा स्वीकार करत केवळ महाराष्ट्रालाच नव्हे तर संपूर्ण देशाला नवा आकृतीबंध घालून दिला. उदारमतवादी विचारांच्या आधारे त्यांनी सामजिक परिवर्तनास दिशा दिली. उदारमतवादी विचारांच्या आधारे व्यक्ती या घटकाला महत्वाचे स्थान देऊन त्यातून समाज आणि राष्ट्र परिणामी सामजिक परिवर्तन होते असे त्यांचे मत होते. व्यक्ती विकासातून समाज विकास आणि समाजाच्या सर्व पातळयांवर परिवर्तन अशा सर्वसमावेशक सामाजिक परिवर्तन करण्यासाठी त्यांचे उदारमतवादी विचार महत्वाचे आहेत .

- व्यक्तीस्वातंत्र्य-

व्यक्ती स्वातंत्र्यामधील ‘व्यक्ती’ हा रानडेंच्या सुधारणेचा केंद्रबिंदू होता. उदारमतवादाच्या मांडणीमध्ये ते व्यक्तीस्वातंत्र्याला अधिक महत्त्व देतात. त्यांचा हा विचार ईश्वरी तत्त्वज्ञानावर आधारलेला होता. प्रत्येक व्यक्तीमध्ये सदसदविवेकबुद्धी असते आणि याच्या आधारेच व्यक्तीला उच्च पातळी प्राप्त करता येते. इथे न्या. रानडे सदसदविवेकबुद्धीला आणि परमेश्वर यांचा सहसंबंध व्यक्त करतात."परमेश्वर सदसद्विवेकबुद्धी द्वारे प्रत्येक मानवामध्ये प्रकट होत असतो म्हणूनच सदसद्विवेकबुद्धी म्हणजे परमेश्वराचा आवाज जो मनुष्याने ऐकला पाहिजे व त्याचप्रमाणे वर्तन केले पाहिजे”.

व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर जी रूढी, प्रथा, परंपरेची जी बंधने आहेत त्याला रानडे विरोध करतात. जीवनात योग्य - अयोग्य हे त्या व्यक्तीने आपल्या आतील आवाजातद्वारे ठरवले पाहिजे. इतरांवरती अवलंबून राहून आंधळेपणाने कोणतीही गोष्ट स्वीकारू नये. सद्सदविवेकबुद्धीला जे योग्य वाटते तेच केले पाहिजेत. कोणत्याही रूढी परंपरांना आहारी न जाता स्वतःच्या भावनाकडे दुर्लक्ष न करता योग्य - आयोग्य यातील भेद करण्याची ताकद व्यक्तीच्या परंपरांना शरण जाण्याऐवजी स्वतःच्या आपल्या आवाजात व्यक्तीने शरण गेले पाहिजे.

मानवाची सद्सदविवेकबुद्धी, विचारशक्ती ही ज्ञान मिळवण्याची महत्त्वपूर्ण साधने आहेत. या साधना आधारे परिस्थितीचा बोध करून त्याला अनुसरून वागण्याचे स्वातंत्र्य हाच मानवी जीवनाचा खरा नैतिक पाया आहे. व्यक्तीला नव - नवीन गोष्टी शिकण्याची समाजपद्धती पाहिजे म्हणजेच बुद्धीचे स्वातंत्र्य मान्य करणारी समाजपद्धती पाहिजे तरच आर्थिक, राजकीय क्षेत्रात सुधारणा शक्य आहे. पुनरुज्जीवन व प्रगती या परस्परांशी निगडित असून बौद्धिक स्वातंत्र्य या तिन्हींचा पाया एकच आहे असे रानडे यांना म्हणायचे आहे.

व्यक्तीच्या स्वातंत्र्याची मांडणी करताना ती नव्या समाजव्यवस्थेसंदर्भात देखील भाष्य करतात. कारण व्यक्ती ज्या समाजात वास्तव करत असते तिथे तिच्या व्यक्तीविकासाला वाव मिळाला तरच व्यक्तीचा समाजाचा पर्यायी राष्ट्राचा विकास होत असतो. म्हणूनच व्यक्तीच्या विकासासाठी सर्वोत्कृष्ट असणाऱ्या नव्या समाज व्यवस्थेचे ते समर्थन करतात. कारण जन्मावर आधारित अशी पूर्वनिश्चित चौकट असते. जिथे व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर बंधने असतात. ही समाजावस्था ते नाकारतात. व्यक्तीच्या

स्वातंत्र्यास अधिकाधिक वाव असणाऱ्या नव्या समाज व्यवस्थेचे स्वागत करतात.

"हिंदुस्तानच्या भावी समाजव्यवस्थेविषयी राहणाऱ्यांच्या ज्या काही कल्पना होत्या त्यामध्ये व्यक्तीची बंधनातून मुक्तता झाली पाहिजे आणि तिला आपली सर्वांगीण उन्नती करून घेण्यास शिकवले पाहिजे या सिद्धांतास अग्रस्थान होते" व्यक्तीने केवळ स्वतःच्या विवेकबुद्धीने वागणे म्हणजे व्यक्तिस्वातंत्र्य एवढाच मर्यादित अर्थ त्यांना अपेक्षित नव्हता तर त्याला ते मानवी कर्तव्याची उदात्त भावनेचा अर्थ देतात. व्यक्तीने स्वतःचे हित - अहित हे स्वतःच्या बुद्धीने करणे हे व्यक्तीचे स्वतःचे कर्तव्य आहे. ही कर्तव्याची भावना प्रत्येकाने अंमलात आणली तर मानवी उदात्ततेच्या आणि स्वातंत्र्याचा व उत्कर्षाचा उदय होईल यावर रानड्यांचा विश्वास होता.

- सामाजिक न्याय-

व्यक्तीविकास, समाजाचा उत्कर्ष, समाजाची उन्नती याबरोबर सामाजिक न्याय प्रस्थापनेसाठी देखील व्यक्तीस्वातंत्र्याची आवश्यकता आहे या दृष्टीने देखील ते विचार मांडतात. सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी व्यक्तीला समान साधने आणि स्वातंत्र्य मिळाले पाहिजेत या तत्त्वावर ते भर देतात. समाजात सुधारणा करताना जिथे जुन्या गोष्टींचा आधार घेणे शक्य आहे तिथे घेणे आणि जिथे आधार घेणे शक्य नसते तिथे क्रांतिकारक सुधारणेचा मार्ग हाती घेणे हे त्यांच्या कार्यपद्धतीचे वैशिष्ट्य होते. उदा. सती यासारख्या चालीची निर्मूलन जुन्या धर्मग्रंथांची संमती असो वा नसो ते केलेच पाहिजे असे त्यांचे मत होते. समाजात न्याय प्रस्थापित करण्यासाठी प्रसंगी शासनव्यवस्थेचा पाठिंबा घेतला पाहिजे. इथे रानडे परिवर्तनाच्या स्तित्यंतरास शासनव्यवस्थेचा हस्तक्षेप मान्य करतात. कायद्याचा पाठिंबा स्वीकारतात. शासनाचा आणि कायद्याचा पाठिंबा ही बाब फारच विलक्षण नसली तरी तत्कालीन परिस्थितीमध्ये शासनाने येथील प्रथा परंपरा नष्ट करण्यासाठी केलेला हस्तक्षेप हा व्यक्तीच्या खाजगी बाबींमध्ये आहे असे माणून शासनाच्या हस्तक्षेपाला विरोध करतात आणि सामाजिक प्रगतीकरता सरकारी हस्तक्षेपला मर्यादा राहणार नाही असे म्हणतात.

- स्त्री सुधारणा-

रानडेंच्या उदारमतवादामध्ये 'स्त्री' सुधारणेला अन्यनसाधारण स्थान आहे. त्यांनी 'स्त्री' प्रश्नांचा उहापोह करताना स्त्रियांची दयनीय स्थिती हे हिंदू धर्माच्या स्थितीशीलतेचे कारण मानले. सामाजिक परिषदेच्या 'पुनरुज्जीवन आणि सुधारणा' या त्यांच्या गाजलेल्या भाषणामध्ये स्त्रीसुधारणेचा पुरस्कार केला आहे. विधवा पुनर्विवाह, जाती अंतर्गत पोट जातीमध्ये विवाह करणे, स्त्री-पुरुषांच्या विवाहाच्या वयात वधार करणे अशा जातीच्या सीमेत काम करणाऱ्या कुटुंबसुधारणेचा पुरस्कार त्यांनी केला. रानडेने 'स्त्री' शिक्षणासाठी शैक्षणिक संस्थांची उभारणी केली. वेडबर्न साहेबांच्या आणि प्रार्थना समाजातील सहकाऱ्यांच्या मदतीने त्यांनी १८८२ मध्ये 'फिमेल हायस्कूलची' स्थापना केली. व्यक्तीवादी भूमिकेतून त्यांनी स्त्रियांना मालमत्तेचा हक्क मिळावा अशी भूमिका घेतली. त्यांनी विभक्त कुटुंब पद्धतीचा पुरस्कार केला व एकत्र कुटुंब पद्धतीला नाकारले. ते याकडेही व्यक्तिवादी भूमिकेतून पाहतात. कारण एकत्र कुटुंब पद्धतीमध्ये निरूउद्योगपणा आळस वाढतो, जमिनीचे तुकडे होतात व यातून व्यक्तीचे व समाजाचे नुकसान होते म्हणून विभक्त कुटुंब पद्धतीला ते मान्यता देतात.

- आर्थिक सुधारणा-

न्या.रानडे यांचे आर्थिक सुधारणाविषयक विचारांची मांडणी म्हणजेच एकूण सामाजिक परिवर्तनाचा एक महत्त्वाचा भाग होता. आर्थिक सुधारणाविषयक विचारांची मांडणी करताना शेती, आयात, निर्यात, व्यापार ,उद्योगधंद्यांची वाढ, स्वदेशीचा पुरस्कार इत्यादी बाबीसंदर्भात त्यांची आर्थिक विचारांची मांडणी येते. न्या. रानडे यांच्या आर्थिक विचारांची मांडणी करताना एक गोष्ट अधोरेखित करावी लागते ती म्हणजे, ते आर्थिक बाबींचा व्यक्तीच्या प्रगतीशी, व्यक्तीच्या विकासाशी संबंध प्रस्थापित करतात. व्यक्तीच्या प्रगतीसाठी येथील अर्थव्यवस्था उत्तम केली पाहिजे तरच व्यक्ती जीवनाशी निगडित असणाऱ्या सर्व बाजू ठीक होतील या अनुषंगाने त्या आर्थिक तत्त्वज्ञाना संदर्भात विचारांची मांडणी येते.

औद्योगीकरण-

व्यक्तीची उन्नती आणि राष्ट्राचा विकास यामध्ये परिवर्तन होण्याच्या अनुषंगाने ते औद्योगीकरणा संदर्भात मांडणी करतात.

औद्योगिक परावलंबन किती दुःखद आहे हे पुण्याच्या १८९० साली भरलेल्या औद्योगिक परिषदेत ते सांगतात, 'पन्नास वर्षांपूर्वी तयार होणारे कापड आपण वापरत होतो आता दूरवर राहणारे आपले धनी आपल्यालाच कापड पुरवतात. रेशमी व उनी कपडे, तेल, चामडे याबाबत ही स्थिती आहे पोलाद वगैरे साठी देखील काही कोटी खर्च झाले याच्याकडेवारी देऊन रानडे म्हणतात की, ही सर्व परिस्थिती लक्षात घेतली तर आपण खोल गर्तेत फेकले जाऊ आपल्या बोटी आपल्या नाहीत, किनाऱ्यावर चालणारा व्यापार ही आपल्या बोटीतून होत नाही. हा जो एकंदर व्यापार चालतो त्यापैकी आपला हिस्सा दोन ते तीन टक्के आहे आणि हे प्रमाण कायम टिकले आहे. बँका उद्योग यातील वर्चस्व हे राजकीय बाबतीतही वर्चस्व स्थापन करते.

न्या. रानडे यांच्या वरील विधानावरून हेच स्पष्ट होते की, औद्योगीकरणासंदर्भात स्वकीयांची झालेली दुरावस्था दिसून येते. सर्व माल इंग्रजांनी त्यांच्या देशातून आणून त्याला भारतातील बाजारपेठ उपलब्ध करून देणे आणि यातून तेथील प्रस्थापित लोकांची होणारी दयनीय अवस्था याची प्रचिती वरील विधानावरून येते.

- शेती आणि औद्योगीकरण-

तत्कालीन कालखंडात अधिकाधिक जनता ही शेतीवर आधारित होती. शेती हाच त्यांचा मुख्य व्यवसाय होता. अर्थार्जनाचा आधार देखील शेती हाच होता. एकाच व त्याही डळमळीत अशा साधनांवर आपणास सर्वस्वी राहायला लागून परिस्थिती अधिकच बिघडली आहे. देशाचा व्यापार व उद्योगधंदे होते तेवढेही आपल्या हातातून जात आहेत. काही काही मोठी शहरे सोडली तर इतर साऱ्या देशांच्या अन्न, वस्त्र, गरम कपडे, साबण, दिवे आणि तेल व इतर सर्व सामान्य सुखसोयी यांच्या बाबतीत हजारो उद्योगधंद्यावर आपल्याला अवलंबून राहावे लागत आहे की, ज्यामध्ये आपल्या लोकांना भाग घेण्याची संधी उत्तरोत्तर कमीच येत आहे.' यावरून शेतीमध्ये नुकसान झाल्यामुळे त्याचे उद्भवलेले परिणाम स्पष्ट होतात. म्हणूनच न्या. रानडे यांनी शेती आणि औद्योगीकरण यांचा सहसंबंध प्रस्थापित केला. शेती करता औद्योगीकरण महत्त्वाच्या आहे असे त्यांचे मत होते. उद्योगधंदे हे शेतीवर आधारित उभे केले तर जो वर्ग अधिकाधिक शेतीशी निगडित वा अवलंबून आहे त्याचा आर्थिक स्तर उंचावेल व स्वदेश वस्तूची निर्मिती होईल आणि आपल्या मालाला येथीलच बाजारपेठ उपलब्ध होईल लोकांच्या गरजा देखील पूर्ण होतील.

न्या. रानडे यांनी शेतीसंदर्भात, शेतकऱ्यांच्या हक्कासंदर्भात सुधारणा सुचवल्या यामध्ये पहिली सुधारणा अशी होती की, शेतकऱ्यांकरिता बँका स्थापन केल्या पाहिजेत. या बँका सरकारच्या ताब्यात राहतील आणि या बँकेतून व्याजाचा दर सावकार घरापेक्षा पुष्कळ कमी राहील व रकमेची परतफेड ही सोयीस्कर हप्त्याने घेतली जाईल. एकंदरीत शेतकरी येथे केंद्रबिंदू ठेवून बँकांची स्थापना व्हावी असे न्या. रानडे यांचे मत होते. दुसरी सुधारणा अशी होती कि, सामाजिक, राजकीय त्याचप्रमाणे आर्थिक कारणाकरता जमिनीत प्रत्यक्ष काम करणाऱ्या शेतकऱ्याला स्वामित्व काही महत्त्वाचे हक्क असणे कसे आवश्यक आहे जेव्हा एखाद्याकडे मालकी हक्क येतो त्यावेळेस तो सर्व धोके पत्करून त्यामध्ये काम करतो म्हणूनच त्यांनी कुळ कायद्याची संकल्पना मांडली.

कुळ कायद्याचे संकल्पना जरी त्यांनी मांडली असली तरी कायदा कायम स्वरूपात कुळाचे संरक्षण करू शकेल असे त्यांना वाटत नव्हते. याउलट त्यांना जुनीच कृषीव्यवस्था अधिक गुंतागुंतीची होईल असे त्यांचे मत होते. याकरता त्यांनी भांडवली शेतीची संकल्पना मांडली. शेतीव्यवस्थेची पुनर्रचना भांडवली पायावर व्हावी असा त्यांचा आग्रह होता. त्यांचीही कल्पना दोन स्तरावरती होती. बहुसंख्य शेतकरी स्वतंत्र आणि छोटे जमीन मालक असतील हा पहिला स्तर व वरच्या स्तरावर एक मोठ्या भांडवलदार शेतकऱ्यांचा वर्ग असेल जो आपल्या जमिनीची पूर्णपणे मालक असेल. छोट्या जमीनमालक शेतकरीवर्गावर राज्य किंवा जमीनदार अशा कोणाचाही बंधन नसेल त्यांच्यावरील कर कायमस्वरूपी कमी करायचे असतील व कमी दरात कर्ज पुरवठ्याची सोय असेल. त्याचबरोबर भांडवलदार शेतकऱ्यांवर कुळाच्या हक्कामुळे येणारी बंधणे नसेल. न्या. रानडे यांनी मांडलेली ही संकल्पना भांडवली पायावर आधारलेली शेतीविषयक कल्पना अभिजनवादी होती. ही भूमिका मांडण्यामागील त्याची भूमिका समजावून घेताना असे लक्षात येते की, शेतीवर संपूर्णतः त्या वर्गाची मालकी प्रस्थापित झाल्यामुळे पूर्ण मालकी त्यांच्या असेल व भांडवली गुंतवायला त्या वर्गाला मोकळीक असेल. त्यामुळे नवीन प्रगत तंत्र वापरले जाईल आणि प्रगती होईल अशी आशा न्या. रानडे यांना होती.

एकंदरीत प्रस्थापित समाजाला राजकीय, लष्करी व औद्योगिक तंत्र लक्षात घेऊन बहुजन समाजाला नव्या ज्ञानाचे व पद्धतीचे शिक्षण दिले पाहिजेत. प्रस्तुत शिक्षण देताना काही जुन्या शिक्षण पद्धतीमध्ये बदल करून तर काही नवीन पद्धतीचे अनुसरून करावे लागेल अशी व्यापक व सर्व समावेशक भूमिका या पाठीमागे होती.

- सर्वसमावेशक धर्म-

न्या. रानडे हे धार्मिक वृत्तीचे आणि आध्यात्मिक होते. हिंदू धर्मावर त्यांची श्रद्धा होती त्यातूनच त्यांनी एकेश्वरवादाचा पुरस्कार केला होता. प्रत्येक व्यक्तीमध्ये ईश्वराचा अंश आहे त्यामुळे स्वतः मधील लाभलेल्या प्रकाराच्या सहाय्याने इतरांचे जीवन सुखी केले पाहिजेत प्रगत केले पाहिजे तसे त्यांचे मत होते. ईश्वरवादी सिद्धांतानुसार जो सर्वांमधील दैवी अंश आहे तोच सर्वांना संघटित करेल सर्व स्त्री पुरुष यांच्यासमोर समान असतील या सिद्धांताच्या आधारावर ते स्त्री पुरुष समानतेचा पुरस्कार करतात. स्वातंत्र्य आणि सर्वांना एकाच पातळीवरती समान मानणाऱ्या भागवत धर्माला देखील ते पुरस्कार करतात. कारण प्रस्तुत भागवत धर्मात संतांनी समानतेचा पुरस्कार केला होता आणि जाती-धर्माच्या पलीकडे जाऊन एकाचवेळी ते सर्वांना भक्तीमार्ग खुला करून देतात. हा धर्म मनुष्याचे श्रेष्ठत्व मान्य करतो म्हणूनच ते भागवत धर्माचा पुरस्कार करतात. भागवत धर्माला सर्वश्रेष्ठ म्हणतात. कारण भागवत धर्म सर्वांस मोकळा व साध्य आहे मग तो पुरुष असो व स्त्री ब्राह्मण असो वा शूद्र असून अशी ज्या धर्माची अगर मार्गाची तत्वे उदार आहे तो सामान्य जनाचा उपयोग व साध्य त्यालाच भागवत धर्म म्हणावे.

भागवत धर्माबरोबरच त्यांनी ब्राम्हो समाज व प्रार्थना समाज यातील देखील तत्वांचा स्वीकार केला होता. कारण ब्राम्हो समाज हा सर्व धर्मीयांना समान मानणारा समाज आहे. या समाजामध्ये सर्वधर्म समावेशनाचे तत्व स्वीकारले होते. हेच रानडे यांच्या धार्मिक विचारातून स्पष्ट होते त्याचबरोबर ते प्रार्थना समाजाची देखील निगडित होते प्रार्थना समाजाची तत्वे ही मानवी कल्याणाची होती. प्रार्थना समाज हा भागवत धर्माचे विकसित रूप होते असे न्या. रानडे यांचे मत होते. मनुष्याच्या कल्याणासोबत प्रार्थना समाजामध्ये सर्व धर्मांना व धर्मग्रंथांना श्रेष्ठ मानतात. सर्व धर्मग्रंथांमध्ये जे श्रेष्ठ आहे त्याचा स्वीकार करायचा हे प्रार्थना समाजाचे महत्त्वाचे तत्व होते. एकंदरीतच न्या. वर्षानुवर्ष चालत आलेल्या धार्मिकतेला ते नवा आयाम देवू पाहताहेत. मनुष्याला केंद्रस्थानी ठेवून समाजाच्या कल्याणासाठी मानवी कल्याणाच्या दृष्टीने ते धार्मिक विचार मांडत आहेत.

न्यायमूर्ती रानडे यांच्या उदारमतवादाचे आविष्कार रमाबाई रानडे-

रमाबाई रानडे यांच्या घरी पुराणमतवादी विचारांचे संस्कार होते परंतु न्या. रानडे यांच्या उदारमतवादी विचारांचा स्वीकार करून त्यांनी प्रत्यक्ष कृती केली होती . व त्यांच्या विचारांचा वारसा जोपासला होता.

- स्त्री सुधारणा-

स्त्रियांच्यावरील बंधने, नियंत्रणे कमी झाले पाहिजेत याकरता त्यांनी प्रत्यक्ष कृती केली. १९०२ साली पुण्यात रमाबाईंनी ‘हिंदू लेडीज सोशल क्लब’ ही संस्था स्थापन केली. या संस्थेचा उद्देश हा स्त्रियांमध्ये ज्ञानप्रसार करून सामाजिक कर्तव्याची जाणीव निर्माण करणे हा होता. या संस्थेमध्ये विविध जाती धर्माच्या स्त्रियांचा सहभाग होता. यावरून रमाबाईंची स्त्रीसुधारणा आणि समावेशनाची भूमिका स्पष्ट होते. त्याचबरोबर मुंबईमध्ये १९०४ मध्ये ‘आद्य भारत महिला परिषद’ भरवली होती. त्याच्या अध्यक्ष रमाबाई होत्या. या परिषदेमध्ये त्यांनी स्त्रियांच्या समस्या मांडल्या. पडदा पद्धती. स्त्री - पुरुष विषमता, सार्वजनिक जीवनातील अल्प सहभाग, अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अभाव इत्यादी मुद्दे त्यांनी मांडले.

स्त्रियांच्या अधिकारासाठी चळवळ-

रमाबाईंनी स्त्रियांना सक्तीचे प्राथमिक शिक्षण व मतदानाचा अधिकारासंदर्भात मागणी करण्यासाठी चळवळ उभी केली. मुलींसाठी प्राथमिक शिक्षण सक्तीचे करावे यासाठी रमाबाईंच्या नेतृत्वाखाली पुण्यात स्त्रियांनी आंदोलन केले. रमाबाईंच्या या आंदोलनाला संपूर्ण देशातील पाठिंबा मिळत होता. स्त्री - पुरुष समानता हे प्रस्तुत आंदोलनाचे पायाभूत तत्व होते. प्राथमिक शिक्षणाबरोबरच महिलांच्या मतदानाच्या हक्का संदर्भात देखील त्यांनी आंदोलन केले. त्यांनी जागोजागी सभा घेऊन मतदानाच्या हक्काचे महत्व पटवून दिले स्त्रियांना मताधिकार मिळावा म्हणून कायदेमंडळाच्या बाहेर पाच महिने आंदोलन लढविले (मार्च ते जुलै १९२१) या चळवळीचे नेतृत्व रमाबाईंनी केले होते. अशा पद्धतीने चळवळीच्या माध्यमातून सामजिक परिवर्तन घडवून आणण्यासाठी, स्त्रियांच्या हक्कासाठी त्यांनी उदारमतवादी तत्त्वाच्या आधारे कार्य केले.

समारोप-

सामाजिक परिवर्तन ही हळुवार चालणारी परंतु समाजामध्ये मोठा बदल घडवून आणणारी प्रक्रिया आहे. कुटुंब, समाज, विवाहसंस्था व राज्यसंस्था अशा अनेक संरचनेमध्ये हा बदल अपेक्षित असतो. न्या. रानडे यांनी या बदलासाठी उदारमतवादी विचारांच्या आधारे प्रयत्न केले. त्याकरिता त्यांनी 'व्यक्ती' हा घटक केंद्रबिंदू मानला. व्यक्तीच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय या सर्व बाजूंचे ज्यावेळी उदारमतवादी विचारांच्या आधारे परिवर्तन होईल तेंव्हाच खर्या अर्थाने सामाजिक परिवर्तन होईल असे त्यांचे मत होते. याच अनुषंगाने त्यांनी उदारमतवादी विचारांची मांडणी केली आहे. म्हणूनच सामाजिक परिवर्तनाच्या अनुषंगाने त्यांचे उदारमतवादी विचारांचा अभ्यास केला आहे.

संदर्भ सूची

१. फडके य. दि - विसाव्या शतकातील महाराष्ट्र खंड १(१९०१ - १९१४) सासवड आश्रम ट्रस्ट, पुणे
२. चोसाळकर अशोक - आधुनिक भारतीय राजकीय प्रवाह आणि अंत:प्रवाह, प्रतिमा प्रकाशन, पुणे
३. बागडे उमेश (२००६), महाराष्ट्रातील प्रबोधन आणि वर्गजात प्रभुत्व, सुगावा प्रकाशन, पुणे
४. पवार वैशाली, (२०१२), उदारमतवादाचा शहरी अविष्कार, महिलांच्या सत्तासंघर्षाचा आलेख, डायमंड प्रकाशन पुणे.
५. टोपे. त्र्य. कृ (१९९२) न्या. महादेव गोविंद रानडे, व्यक्ती कार्य आणि कर्तुत्व, रोहन प्रकाशन, पुणे